**मे. ॲग्रोमार्क फूडस प्रा. लि. मौजे भदाणे, ता. जि. धुळे, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित १०५ किलो लिटर प्रतिदिन मळीवर / धान्यावर आधारीत आसवणी निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

.......................................................................................................................................

मे. ॲग्रोमार्क फूडस प्रा. लि. गट नं. ५०२/१/अ, ५०२/१/ब आणि ५०५ मौजे भदाणे, ता. जि. धुळे, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित १०५ किलो लिटर प्रतिदिन मळीवर / धान्यावर आधारीत आसवणी निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, धुळे यांचे अध्यक्षतेखाली दि. २४ ऑगष्ट २०२२ रोजी सकाळी ११-०० वाजता घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ५६ / २०२२ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २२०८१० – एफटीएस– ०१६८ दि. १०/०८/२०२२ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, धुळे | : | अध्यक्षा |
| २. | प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, नाशिक | : | सदस्य |
| ३. | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, धुळे | : | समन्वयक |

श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ धुळे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला होता. सदर जाहीर लोकसुनावणी बाबतची जाहीर सुचना दि. २२/०७/२०२२ रोजी दै. लोकमत (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, धुळे येथे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे
- जिल्हा उदयोग केंद्र, धुळे
- जिल्हा परिषद, धुळे
- उपविभागीय कार्यालय, धुळे
- तहसिल कार्यालय, धुळे
- ग्रामपंचायत कार्यालय, भदाणे
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, धुळे.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, नाशिक

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,(मुख्यालय), मुंबई
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पा बाबत अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ धुळे यांचेकडे कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात प्राप्त झालेला नाही. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी अध्यक्षा, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाचे प्रतिनिधी व टेक्नोग्रीन इन्व्हायर्नमेंटल सोलूशन्स, पुणे यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले. जसे की पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी नियोजित प्रकल्पाविषयी केलेल्या सादरीकरणा नंतर नागरिकांनी मांडलेल्या सूचना / आक्षेप इत्यादींचा वृत्तांत खालीलप्रमाणे.

**प्रोसेडींग :**

| अ. क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी नोंदविणा-या व्यक्तिचे नांव व पत्ता | उदयोगाच्या प्रतिनिधीने दिलेले आश्वासन / उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. कृष्णा खताळ,<br>माजी सरपंच भदाणे यांनी मुददा उपस्थित केला की, रोजगार देतांना स्थानीक रहिवाशांना प्राधान्य देण्यात यावे. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, रोजगाराच्या संधी देतांना किमान ५० टक्के स्थानिक व पंचक्रोशीतील नागरिकांना प्राधान्य देण्यात येईल. |
| २. | श्री. ज्योतीराम करनार<br>रा. भदाणे, ता. जि. धुळे यांनी मुददा उपस्थित केला की, प्रस्तावित उदयोगासाठी लागणारे धान्य खरेदी करतांना स्थानिक शेतक-यांकडून घेण्यासाठी प्राधान्य दयावे.<br>तसेच त्यांनी पुढे मुदद मांडला की, सदर प्रस्तावित उदयोगामुळे मेंढपाळांना अडचणी येऊ नयेत. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, प्रस्तावित उदयोगासाठी लागणारा कच्चा माल / धान्य खरेदी करतांना स्थानिक शेतक-यांकडून घेण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.<br>उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, सदर प्रस्तावित उदयोगामुळे मेंढपाळांना कोणतीही अडचण येणार नाही परंतु कारखान्यात तयार होणारे पशुखादय मेंढपाळांना त्यांच्या मेंढींसाठी उपयुक्त राहील. |
| ३. | श्री. विकास थोरात रा. भदाणे, ता. जि. धुळे यांनी मुददा उपस्थित केला की, रोजगार देतांना स्थानीक सुशिक्षित रहिवाशांना प्राधान्य देण्यात यावे. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, त्यांनी यापुर्वी प्रश्न क्रं १ ला अनुसरुन उत्तर दिले आहे. पुन्हा त्यांनी नमुद केले की, रोजगाराच्या संधी देतांना किमान ५० टक्के स्थानिक व पंचक्रोशीतील नागरिकांना प्राधान्य देण्यात येईल. |

सदर जाहीर लोक सुनावणीचे समन्वयक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ धुळे यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात परंतु कोणीही मुददा उपस्थित केला नाही. त्यांनी पुढे नमुद केले की, सदर जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त पर्यावरण विभाग यांना सादर करण्यात येईल. तसेच सदर इतिवृत्तासोबत व्हीडीओ, फोटोग्राफस, उपस्थिती इत्यादीं माहितीसह सादर केले जाईल.

सदर जाहीर लोकसुनावणीच्या अध्यक्षा यांनी पुढील सुचना केल्या.

१. प्रस्तावित उदयोपासून हवेचे / पाण्याचे / आवाजाचे प्रदूषण होणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्यात याव्यात.

२. उत्पादन प्रक्रियेमध्ये प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुर्नवापर करण्यात यावा व पाण्याचा किमान वापर करण्यात यावा.

३. प्रस्तावित उदयोगाने कच्चा माल (धान्य) स्थानीक शेतक-यांकडून घ्यावे.

तदनंतर त्यांनी नमुद केले की, -

१. प्रस्तावित उदयोगामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल त्यामुळे परिसराचा आर्थीक विकास होईल.

२. स्थानीक रहिवाशांना जनावरांसाठी खादय व कृषी खादय उपलब्ध होईल.

३. रोजगाराच्या संधीमुळे स्थानीक रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

तदनंतर सदर सुनावणीच्या अध्यक्षा यांनी प्रस्तावित उदयोजकाने दुर्गम भागात उदयोग स्थापन करण्याचे ठरविल्यामुळे त्यांचे आभार मानले. तसेच सदर सुनावणीत उपस्थित असलेले रहिवाशी व विविध कार्यालयांमध्ये कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचा-यांचे आभार मानले. तदनंतर सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| Pakhale | | |
| **( प्रणव पाखले )** | **( रविंद्र आंधळे )** | **( तृप्ती धोडमिसे,** भाप्रसे) |
| समन्वयक तथा उप्राअ | सदस्य तथा प्रा.अ. | अध्यक्षा तथा सहा.जिल्हाधिकारी, |
| मप्रनि मं. धुळे | मप्रनि मं. नाशिक | उपं विभागीय अधिकारी,धुळे |